**राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ च्या अहवाल खंड-२ मधील शिफारशीच्या अनुषंगाने स्वीकृत वेतनस्तरविषयक वेतननिश्चितीसंबंधी स्पष्टीकरण.**

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक : वेपुर -११२३/प्र.क्र.५/सेवा-९**
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२
दिनांक :- २२ फेब्रुवारी, २०२४

**वाचा :-** १. शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक वेपुर-१२१६/प्र.क्र.५८/सेवा-९, दिनांक १७ जानेवारी, २०१७
२. शासन निर्णय क्रमांक : वेपुर ११२१/प्र.क्र. ४/सेवा-९, दिनांक १३ फेब्रुवारी, २०२३

**परिपत्रक**

शासनाने, राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीत सुधारणा करण्याच्या दृष्टीने शिफारस करण्यासाठी शासन निर्णय, वित्त् विभाग, क्रमांक वेपुर-१२१६/प्र.क्र.५८/सेवा-९, दिनांक १७ जानेवारी, २०१७ रोजी राज्य वेतन सुधारणा समिती (बक्षी समिती) स्थापन केली होती. सदरहू समितीने आपला अहवाल खंड-२ शासनास सादर केला आहे.

सदर अहवालातील वेतनश्रेणीविषयक शिफारशींची व त्यावर शासनाने घेतलेल्या निर्णयाबाबतचे आदेश शासन निर्णय, वित्त विभाग, वेपुर-११२१/प्र.क्र.४/सेवा-९, दिनांक १३ फेब्रुवारी, २०२३ रोजी निर्गमित करण्यात आले आहेत. या शासन निर्णयातील जोडपत्र क्रमांक १, विवरणपत्र - अ मध्ये राज्य वेतन सुधारणा समितीने केलेल्या शिफारशी शासनाने मान्य करुन ज्या संवर्गांना सुधारित वेतनस्तर मंजूर केलेले आहेत. त्या संवर्गांची (एकूण १०४ संवर्ग ) यादी जोडलेली आहे.

सदर यादीमध्ये नमूद केलेल्या संवर्गांना सुधारित वेतनस्तर दिनांक १ जानेवारी, २०१६ पासून काल्पनिकरित्या मंजूर करण्यात आला आहे व प्रत्यक्ष आर्थिक लाभ १ फेब्रुवारी २०२३ पासून अनुज्ञेय करण्यात आला आहे. दिनांक १ जानेवारी,२०१६ ते ३१ जानेवारी, २०२३ पर्यंतची कोणतीही थकबाकी अनुज्ञेय करण्यात आलेली नाही.

सुधारित वेतनस्तरात वरील संवर्गातील अधिकारी/कर्मचाऱ्यांची दिनांक १.१.२०१६ पासून वेतननिश्चिती करताना काही प्रकरणी पूर्वीच्या वेतनस्तरातील वेतनापेक्षा सुधारित वेतनस्तरामध्ये वेतन कमी निश्चित होत असल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आणलेली आहे. या बाबीवर विचारविनिमय करुन शासनाकडून पुढीलप्रमाणे स्पष्टीकरण करण्यात येत आहे.

संबंधित १०४ संवर्गातील ज्या अधिकारी/कर्मचाऱ्यांची शासन अधिसूचना दिनांक ३० जानेवारी, २०१९ नुसार दिनांक १.१.२०१६ रोजी वेतननिश्चिती केल्यानंतर तसेच ज्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना दिनांक १.१.२०१६ रोजी आश्वासित प्रगती योजनेचा लाभ लागू होत असेल तर त्यानुसार वेतननिश्चिती केल्यानंतर त्यांचे वेतन सातव्या वेतन आयोगातील बक्षी समिती, खंड-२ नुसार शासन निर्णय, दिनांक १३ फेब्रुवारी, २०२३ अन्वये सुधारित केलेल्या वेतनस्तरात दिनांक १.१.२०१६ रोजी वेतननिश्चिती केल्यामुळे वेतन कमी होत असेल अशा कर्मचाऱ्यांना म.ना.से.(वेतन) नियम १९८१ मधील नियम १५ नुसार जुन्या वेतनस्तरातील त्याची लगतनंतरची किंवा त्यानंतरची कोणतीही वेतनवाढ देय होईल त्या तारखेपर्यन्त किंवा तो ते पद सोडील तोपर्यंत किंवा त्याला त्या समयश्रेणीमध्ये वेतन मिळण्याचे बंद होईपर्यन्त तो आपले शासन अधिसूचना दिनांक ३० जानेवारी, २०१९ नुसार लागू झालेल्या जुन्या वेतनस्तरातील वेतन घेणे चालू ठेवण्याचा विकल्प देण्याची सुविधा त्याला देण्यात येत आहे. (सदर विकल्पाचा नमुना सोबत जोडला आहे.)

ज्या अधिकारी/कर्मचारी यांना उपरोक्तप्रमाणे विकल्प देण्याची सुविधा लागू असेल अशा अधिकारी/कर्मचाऱ्यांनी सदर विकल्प या आदेशाच्या दिनांकापासून ३ महिन्यांच्या कालावधीत देण्यात यावा. यानुसार दिलेला विकल्प अंतिम राहील.

तथापि, संबंधित १०४ संवर्गापैकी ज्या कर्मचाऱ्यांच्या वेतनात बक्षी समितीच्या खंड-२ नुसार लागू केलेल्या वेतनस्तरात वेतननिश्चिती केल्यामुळे पूर्वीच्या वेतनस्तरात निश्चित झालेल्या वेतनापेक्षा वाढ होत आहे अशा कर्मचाऱ्यांना उपरोक्त प्रमाणे विकल्प देण्याची सुविधा उपलब्ध नाही.

सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुखांनी या परिपत्रकातील सूचना संबंधित कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणाव्यात.

सदर परिपत्रक वित्त विभाग, सेवा-३ कार्यासनाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.४८८/२०२३, दि.०५.१२.२०२३ च्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०२४०२२२१८३०१३६७०५ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**( वि.अ.धोत्रे )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति -**

| | |
|---|---|
| राज्यपालांचे सचिव<br>मुख्यमंत्री यांचे सचिव<br>अध्यक्ष/उपाध्यक्ष, विधानसभा यांचे खाजगी सचिव<br>सभापती/ उपसभापती, विधानपरिषद यांचे खाजगी | निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई<br>सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,<br>लेखा अधिकारी, वेतन पडताळणी पथक, |

| | |
|---|---|
| सचिव<br>सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव<br>विधानसभा/विधानपरिषद विरोधी पक्ष नेता<br>सर्व विधानमंडळ सदस्य, विधानभवन, मुंबई<br>मंत्रालयीन सर्व विभाग<br>मंत्रालयीन सर्व विभागाच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख<br># प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई.<br># प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई.<br>#सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.<br># सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.<br>#प्रबंधक,लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय,मुंबई.<br># आयुक्त राज्य माहिती आयोग, (सर्व)<br># सचिव राज्य निवडणूक आयोग, मुंबई.<br># प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई/नागपूर/औरंगाबाद.<br>राज्य महिला आयोग, वरळी, मुंबई.<br>सर्व विभागीय आयुक्त.<br>सर्व जिल्हाधिकारी<br>सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा.<br>महासंचालक, यशदा, राजभवन आवान, पुणे | मुंबई / नागपूर / पुणे / औरंगाबाद.<br>मुख्य अधिकारी, सर्व नगरपालिका<br>कार्यकारी अधिकारी, कॅन्टोनमेंट बोर्ड,<br>खडकी / देहू रोड/ देवळाली/ अहमदनगर.<br>कुलसचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहूरी, जिल्हा अहमदनगर<br>कुलसचिव, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी<br>कुलसचिव, पंजाबराव कृषि विद्यापीठ, अकोला<br>कुलसचिव, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा रत्नागिरी.<br>कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, नागपूर.<br>कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे.<br>कुलसचिव, नागपूर विद्यापीठ, नागपूर<br>कुलसचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद<br>कुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड<br>कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर<br>कुलसचिव, अमरावती विद्यापीठ, अमरावती<br>कुलसचिव, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई |

(शासन परिपत्रक, वित्त विभाग क्रमांक वेपूर- ११२३/प्र.क्र.५/सेवा-९, दिनांक २२.२.२०२४ चे सहपत्र

( पहा म.ना.से.(वेतन) नियम १९८१ मधील नियम १५ )

(शासन निर्णय दिनांक १३ फेब्रुवारी, २०२३ नुसार पूर्वीच्या वेतनस्तरात निश्चित होणाऱ्या वेतनापेक्षा कमी वेतन निश्चित झालेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांसाठी)

विकल्पाचा नमुना

१) कर्मचाऱ्याचे नाव : -------------------------------------------------------------------

२) धारण केलेले पद : --------------------------------------------------------------------

३) शासन अधिसूचना दिनांक ३० जानेवारी, २०१९ नुसार मंजूर केलेला वेतनस्तर : **-------------

४) शासन निर्णय, दिनांक १३ फेब्रुवारी, २०२३ नुसार सुधारित केलेला वेतनस्तर :**-------------

५) कार्यालयाचे नाव :-------------------------------------------------------------------

२. मी श्री./श्रीमती/कुमारी --------------------------- असा विकल्प देत आहे की, माझी दिनांक १.१.२०१६ रोजी शासन अधिसूचना दिनांक ३० जानेवारी, २०१९ नुसार माझ्या -----------या पदास लागू केलेल्या वेतनस्तरात/आश्वासित प्रगती योजनेंतर्गत देय होणाऱ्या पहिल्या / दुसऱ्या/तिसऱ्या लाभानुसार लागू होणाऱ्या वेतनस्तरात दिनांक १.१.२०१६ रोजी वेतननिश्चिती करण्यात आली आहे. सद्यस्थितीत वित्त विभाग, शासन निर्णय क्र. वेपूर ११२१/प्र.क्र.४/सेवा-९, दिनांक १३ फेब्रुवारी, २०२३ अन्वये सदर पदास खंड-२ नुसार वेतनस्तर ----------- लागू केला आहे. त्यानुसार सुधारित वेतनस्तरात माझी दिनांक १.१.२०१६ रोजी शासन अधिसूचना, दिनांक ३० जानेवारी, २०१९ नुसार वेतननिश्चिती केल्यास अथवा तद्नंतर आश्वासित प्रगती योजनेंतर्गत देय होणाऱ्या पहिल्या / दुसऱ्या /तिसऱ्या लाभानुसार वेतननिश्चिती केल्यास माझ्या पूर्वीच्या वेतनस्तरात निश्चित होणाऱ्या वेतनापेक्षा कमी वेतन निश्चित होत आहे. तरी मी वित्त विभाग, शासन परिपत्रक, क्रमांक वेपूर-११२३/प्र.क्र.५/सेवा-९, दिनांक २२.२.२०२४ अन्वये दिलेल्या सुविधेनुसार पुढीलप्रमाणे विकल्प देत आहे.

१) मी दिनांक १.१.२०१६ पासून शासन अधिसूचना दिनांक ३० जानेवारी, २०१९ नुसार लागू झालेल्या वेतनस्तराची निवड करतो/करते.

- माझ्या पुढील वेतनवाढीच्या दिनांकापर्यंत ----------------------------
- माझे वेतन रु--------------- पर्यंत वाढवणाऱ्या नंतरच्या वेतनवाढीच्या दिनांकापर्यंत
- मी पद रिक्त करेपर्यंत किंवा विद्यमान वेतनस्तरात वेतन घेण्याचे बंद करेपर्यंत.

हा विकल्प अंतिम असून, त्यामध्ये या दिनांकानंतर सुधारणा करण्यात येणार नाही.

ठिकाण : सही :

दिनांक : नाव :

(केवळ कार्यालयाने भरावयाचे)

प्रमाणित करण्यात येते की, * कायम / स्थानापन्न पद धारण करीत असलेल्या

- श्री / श्रीमती / कुमारी -------------------------------------------- यांनी हा विकल्प, यथोचितरित्या स्वाक्षरीसह व विहित दिनांकापूर्वी मला सादर केला आहे.

ठिकाण : सही :

दिनांक : नाव :

कार्यालय प्रमुख :

- लागू नसेल ते खोडावे

** वेतन स्तर क्रमांक नमूद करावा.